# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता

महाविद्यालये / संस्था संलग्नीकरण / मान्यतेसाठी

## सविस्तर माहिती / सूचना

१) बृहत आराखडा, विहित अर्जाचा मसुदा, शुल्क भरण्याची पद्धत इ. माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या bcud.unipune.ac.in या संकेतस्थळावर Affiliation Online या Link मध्ये उपलब्ध आहे. विहित नमुन्यातील अर्जासाठी संपूर्ण माहिती फक्त संकेतस्थळामार्फत online भरावी लागणार आहे.

२) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ८१ व ८२ अन्वये अर्ज करीत असताना,

अ) संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थांनी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ५ जुलै, २०१४ च्या राजपत्राचे अवलोकन करावे. त्याचप्रमाणे विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक १०४/२०१५ याचाही अर्ज सादर करताना विचार करावा.

ब) विहित नमुन्यातील अर्ज मा. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७ यांचे नावे आवश्यक त्या कागदपत्रांसह शैक्षणिक विभागात तीन प्रतीत सादर करावेत.

क) सदर जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून, विद्यापीठाकडे समक्ष सादर केलेले अर्ज, पूर्ण माहिती भरलेले आणि मुदतीत online प्रकियेमार्फत विहीत शुल्कासह माहिती भरून सादर केलेले अर्जच दि. ३१ डिसेंबर, २०१५ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत स्वीकारले जातील.

ड) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमासाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

इ) बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून फक्त विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राबविण्यात येईल. ज्यांना बी.सी.ए. अभ्यासक्रम नव्याने सुरू करावयाचा आहे अशा संलग्नित महाविद्यालयांमध्ये विज्ञान विद्याशाखा असणे आवश्यक आहे.

३) बृहत आराखडयाबाहेरच्या क्षेत्रासाठी व अभ्यासक्रमासाठी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

४) विद्यापीठाकडे अर्ज करून त्याची एक प्रत मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठविणे आवश्यक आहे.

५) नव्याने महाविद्यालयाचे संलग्नीकरणासाठी तसेच संस्थांच्या मान्यतेसाठी शासनाने तयार केलेली नवीन कार्यपध्दती (संबंधित शासन निर्णय) संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या कार्यपध्दतीचे अवलोकन करून त्यानंतरच प्रस्ताव भरावेत.

६) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एनजीसी २०१२/(२४७/१२) मशि ४, दि. २ सप्टेंबर, २०१३ अन्वये प्रस्ताव सादर करताना महाविद्यालयामध्ये असलेल्या सोयी-सुविधांचे व कर्मचारी/शिक्षक यांच्याविषयीचे व्हिडिओ चित्रीकरण असलेली व्ही.सी.डी. आवश्यक आहे.

जावक क्रमांक : सीए/ ३३५१ )
दिनांक :१० डिसेंबर, २०१५ )

मा.
डॉ. नरेंद्र कडू
कुलसचिव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२(९) नुसार सुधारित केलेला शैक्षणिक वर्ष २०१६–१७ या वर्षाचा बृहत आराखडा

सूचना:१) शासन पत्र संदर्भ क्र. बी.एड. (२००९/सीआर–९०/०९)/मशि–१, दि. २३ जून, २००९ नुसार बी.एड. महाविद्यालयासाठी बृहत आराखड्यात शिफारस नाही.

२) राष्ट्रीय अध्यापक शिक्षण परिषद, (एन.सी.टी.ई.) भोपाळ यांनी निर्गमित केलेल्या नोव्हेंबर, २०१४ च्या राजपत्रानुसार बी.एस्सी.बी.एड. व बी.ए.बी.एड. (४ वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम) सध्या अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांकडून या नवीन अभ्यासक्रमांसाठी प्रस्ताव स्विकारले जातील.

३) विधी महाविद्यालयासाठी 'न्यायालयीन प्रक्रियेचे अवलोकन करण्याच्या मुबलक संधी' हा महत्वाचा निकष विचारात घेवून प्रस्ताव स्विकारण्यात येईल.

४) ज्या तालुक्यात वाणिज्य विद्याशखेअंतर्गत बी.बी.ए. (इंटरनॅशनल बिझनेस) व बी.बी.ए. (कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स) या अभ्यासक्रमांची एकही तुकडी अस्तित्वात नाही अशा तालुक्यात अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांकडून बी.बी.ए. (इंटरनॅशनल बिझनेस) व बी.बी.ए. (कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स) या अभ्यासक्रमांना मागणी झाल्यास जास्तीत जास्त एक तुकडीचा विचार करण्यात येईल.

५) विज्ञान विद्याशाखेअंतर्गत बी.एस्सी. अभ्यासक्रम असणा–या महाविद्यालयांनाच बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स व बी.सी.ए. (विज्ञान विद्याशाखेअंतर्गत) या अभ्यासक्रमास परवानगी देण्यात येईल. तसेच एम.सी.ए. (सायन्स), एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स), व बी.एस्सी. (ॲनिमेशन) अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी बी.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) या अभ्यासक्रमाच्या तृतीयवर्षाच्या किमान दोन बॅचेस बाहेर पडणे गरजेचे आहे. तसेच एम.सी.ए. (विज्ञान विद्याशाखा) हा अभ्यासक्रम सुरू करण्यापूर्वी ए.आय.सी.टी.ई.ची मान्यता घेणे आवश्यक आहे.

६) सध्याच्या संलग्नित महाविद्यालयास बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त तीन तुकडयांचे मर्यादेपर्यंतच परवानगी देण्यात येईल. तसेच येथून पुढे नव्याने तुकडीवाढ देताना जुन्या तुकडयांची संख्या विचारात घेऊन कला व विज्ञान विद्याशाखांमधील पदवी अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालयातील एकूण

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे-७ शैक्षणिक विभाग

विद्याशाखानिहाय तुकडयांची मर्यादा चार राहील. वाणिज्य विद्याशाखांमधील पदवी अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालयातील एकूण विद्याशाखानिहाय तुकडयांची मर्यादा पाच राहील.

७) सध्याच्या संलग्नीत महाविद्यालयास एम.एस्सी/एम.ए/एम.कॉम. या अभ्यासक्रमासाठी जास्तीत जास्त दोन तुकडयांचे मर्यादेपर्यंतच परवानगी देण्यात येईल.

८) पुणे शहर – १, पुणे ग्रामीण (हवेली) – १ व नाशिक शहर – १ अशी नव्याने अंध विद्यार्थ्यांसाठी कला, व वाणिज्य विद्याशाखेअंतर्गत महाविद्यालये प्रस्तावित करण्यात येत आहे.

९) ॲप्लाईड आर्टस्/परफॉर्मिंग आर्टस्/फॅशन डिझाईन यासाठी पुणे शहरामध्ये–१, अहमदनगर शहरामध्ये–१ व नाशिक शहरामध्ये–१ अशी महाविद्यालये नव्याने प्रास्तावित करण्यात येत आहेत.

१०) ज्या महाविद्यालयांमध्ये १० वर्षांहून अधिक काळ निरंतर बी.एस्सी. अभ्यासक्रम राबविला जातो, अशा पुणे शहरातील महाविद्यालयांमध्ये बी.एस्सी. (Blended) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१६–१७ साठी सुरू करण्यासाठीचे प्रस्ताव स्वीकारण्यात येतील. बी.एस्सी. होमसायन्स महाविद्यालय सुरू करावयाचे असल्यास प्राधान्याने परवानगी देण्यात येईल.

११) अस्तित्वात असलेल्या कला व वाणिज्य महाविद्यालयांनी विज्ञान विद्याशाखेची मागणी केल्यास विचार करण्यात येईल.

१२) ज्या विद्याशाखांमध्ये प्रवेशित विद्यार्थीसंख्या मान्य विद्यार्थी संख्येच्या २५ टक्कांपेक्षा कमी विद्यार्थीसंख्या आहे अशा ठिकाणी पुढील ३ वर्षासाठी महाविद्यालय प्रस्तावित केलेले नाही.

१३) शैक्षणिक वर्ष २०१६–१७ साठी बृहत आराखडयातील शिफारशी अंतिम राहतील. कोणत्याही संस्थेने बृहत आराखडया व्यतिरिक्त कोणत्याही विद्याशाखेचे महाविद्यालय हक्क म्हणून मागू नये.

१४) शहराच्या व तालुक्याच्या ठिकाणी शिफारस केलेल्या महाविद्यालयाचे स्थळ ठरविणे व्यवहार्य वाटत नाही. अथवा व्यावहारिक पातळीवर ते शक्यही होत नाही. गरजांचा व मागणीचा अभ्यास करून स्थळ निश्चित करण्याचे अधिकार विद्यापीठ अधिकार मंडळाला राहतील.

१५) शहरी भागामध्ये व झपाटयाने विकसित होणाऱ्या औद्योगिक क्षेत्रामध्ये रात्र महाविद्यालयांची गरज आहे. अशी महाविद्यालये प्रस्तावित करण्यात येत आहे.

१६) अहमदनगर शहर, नाशिक शहर, व पिंपरी–चिंचवड महानगरपालिका हद्द येथे प्रत्येकी १ महिला महाविद्यालये प्रस्तावित करण्यात येत आहे.

१७) आदिवासी, डोंगरी व दुर्गम भागात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये प्रस्तावित करण्यात येत आहे. तेथे अंतराचा विचार होऊ नये.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७. शैक्षणिक विभाग

१८) सध्या अस्तित्वात असलेले कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला पायलट प्रोजेक्ट म्हणून कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र, पदविका व प्रगत पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

१९) व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेतील नवीन संस्थांना बी.एच.एम.सी.टी. अभ्यासक्रम वगळून इतर अभ्यासक्रमांना बृहत आराखडयात शिफारस नाही.

२०) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये बृहत आराखडयात प्रस्तावित करण्यात येत आहेत. कोणत्याही औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयामध्ये पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास शिफारस नाही.

२१) अभियांत्रिकी विद्याशाखेच्या अंतर्गत नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय, पदवी अभ्यासक्रम, पदव्युत्तर अभ्यासक्रंम, डायरेक्ट द्वितीयवर्ष प्रवेश अभ्यासक्रमं यासाठी बृहत आराखडयात शिफारस कंरण्यात आलेली नाही.

२२) वास्तुशास्त्र विद्याशाखेतील नवीन महाविद्यालये बृहत आराखडयात प्रस्तावित करण्यात येत आहेत.

२३) राष्ट्रीय स्तरांवरील शिखर परिषदांनी संलग्नता देणाऱ्या विद्यापीठाचे ना—हरकत पत्र असल्याशिवाय शैक्षणिक संस्थांना शासनाने परस्पर परवानगी देऊ नये.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७. शैक्षणिक विभाग

तक्ता क्र. १

पुणे जिल्हा पदवी अभ्यासक्रम

तालुका निहाय प्रस्तावित नवीन महाविद्यालये

शैक्षणिक वर्ष २०१६–२०१७

| अ. क्र. | तालुका | कला, वाणिज्य व विज्ञान | बी.एड. | विधी | शारीरिक शिक्षणशास्त्र | अभियांत्रिकी | वास्तुशास्त्र | फार्मसी | व्यवस्थापन शास्त्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | पुणे शहर (मनपा हद्द) | १ अॅप्लाईड आर्टस्/परफॉर्मिंग आर्टस्/फॅशन डिझाईन १ अंध विद्यार्थ्यांसाठी (कला व वाणिज्य) | — | — | — | — | १ | १ | — |
| २ | पिंपरी चिंचवड (मनपा हद्द) | १ महिला महाविद्यालय | — | — | — | — | १ | — | १ (BHMCT) ए.आय.सी.टी.ई. मान्यताप्राप्त |
| ३ | हवेली (मनपा हद्द वगळून) | १ (कला, वाणिज्य व विज्ञान ) १ अंध विद्यार्थ्यांसाठी (कला व वाणिज्य) | — | — | — | — | १ | — | — |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७. शैक्षणिक विभाग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | खेड | १<br>कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय | — | — | — | — | — | — | — |
| ५ | आंबेगाव | १<br>(आदिवासी व दुर्गम भाग) | — | — | — | — | — | — | — |
| ६ | जुन्नर | १<br>(आदिवासी व दुर्गम भाग) | — | — | — | — | — | — | — |
| ७ | शिरूर | — | — | — | — | — | — | — | — |
| ८ | दौंड | — | — | — | — | — | — | — | — |
| ९ | इंदापूर | — | — | — | — | — | १ | १ | — |
| १० | बारामती | १ | — | — | — | — | — | — | — |
| ११ | पुरंदर | — | — | — | — | — | — | — | — |
| १२ | भोर | — | — | — | — | — | — | — | — |
| १३ | वेल्हा | — | — | — | — | — | — | — | — |
| १४ | मुळशी (मनपा हद्द वगळून) | १<br>(आदिवासी व दुर्गम भाग) | — | — | — | — | — | — | — |
| १५ | मावळ (मनपा हद्द वगळून) | — | — | — | — | — | — | — | — |
| | **प्रस्तावित नवीन एकूण** | १० | | | | | ०४ | ०२ | ०१ |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
शैक्षणिक विभाग

तक्ता क्र. १

अहमदनगर जिल्हा पदवी अभ्यासक्रम

तालुका निहाय प्रस्तावित नवीन महाविद्यालये

शैक्षणिक वर्ष २०१६–२०१७

| अ. क्र. | तालुका | कला, वाणिज्य व विज्ञान | बी.एड. | विधी | शारीरिक शिक्षणशास्त्र | अभियांत्रिकी | वास्तुशास्त्र | फार्मसी | व्यवस्थापन शास्त्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | नगर | १<br>कला वाणिज्य रात्र महाविद्यालय<br><br>१<br>ॲप्लाईड आर्टस्/परफॉर्मिंग आर्टस्/फॅशन डिझाईन<br><br>१<br>महिला महाविद्यालय | — | १ | १ | — | १ | १ | — |
| २ | राहुरी | — | — | — | — | — | — | — | — |
| ३ | श्रीरामपूर | — | — | — | — | — | — | — | — |
| ४ | राहाता | — | — | — | — | — | — | — | — |
| ५ | नेवासा | — | — | — | — | — | — | — | — |
| ६ | शेवगाव | — | — | — | — | — | — | — | — |
| ७ | पाथर्डी | — | — | — | — | — | — | — | — |
| ८ | जामखेड | — | — | — | — | — | — | १ | — |
| ९ | कर्जत | — | — | — | — | — | — | — | — |
| १० | श्रीगोंदा | — | — | — | — | — | — | — | — |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७. शैक्षणिक विभाग

| अ. क्र. | तालुका | कला, वाणिज्य व विज्ञान | बी.एड. | विधी | शारीरिक शिक्षणशास्त्र | अभियांत्रिकी | वास्तुशास्त्र | फार्मसी | व्यवस्थापन शास्त्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | पारनेर | — | — | — | — | — | — | — | — |
| १२ | अकोले | १ (आदिवासी व दुर्गम भाग) | — | — | — | — | — | — | — |
| १३ | संगमनेर | — | — | — | — | — | — | — | — |
| १४ | कोपरगाव | — | — | — | — | — | — | — | — |
| | एकूण | ०४ | — | ०१ | ०१ | — | ०१ | ०२ | — |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
★ शैक्षणिक विभाग ★

तक्ता क्र. १

# नाशिक जिल्हा पदवी अभ्यासक्रम
## तालुका निहाय प्रस्तावित नवीन महाविद्यालये
## शैक्षणिक वर्ष २०१६—२०१७

| अ. क्र. | तालुका | कला, वाणिज्य व विज्ञान | बी.एड. | विधी | शारीरिक शिक्षणशास्त्र | अभियांत्रिकी | वास्तुशास्त्र | फार्मसी | व्यवस्थापन शास्त्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | नाशिक | १ अंध विद्यार्थ्यांसाठी (कला व वाणिज्य) १ महिलांसाठी १ ॲप्लाईड आर्टस्/परफॉर्मिंग आर्टस्/फॅशन डिझाईन | — | १ | १ | — | १ | — | — |
| २ | पेठ | — | — | — | — | — | — | — | — |
| ३ | त्र्यंबकेश्वर | — | — | — | — | — | — | — | — |
| ४ | दिंडोरी | — | — | — | — | — | — | — | — |
| ५ | सुरगाणा | १ | — | — | — | — | — | — | — |
| ६ | कळवण | — | — | — | — | — | — | — | — |
| ७ | बागलाण | — | — | — | — | — | — | १ | — |
| ८ | मालेगाव | — | — | — | — | — | — | — | — |
| ९ | चांदवड | — | — | — | — | — | १ | — | — |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७. शैक्षणिक विभाग

—८—

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | नांदगाव | — | — | — | — | — | — | — | — |
| ११ | येवला | १ | — | — | — | — | — | — | — |
| १२ | निफाड | — | — | — | — | — | — | — | — |
| १३ | सिन्नर | १ | — | — | — | — | — | — | — |
| १४ | इगतपुरी | — | — | — | — | — | — | — | — |
| १५ | देवळा | — | — | — | — | — | — | — | — |
| १६ | सिल्वासा (दादरा नगर हवेली) | — | — | — | — | — | — | — | — |
| | **प्रस्तावित नवीन एकूण** | ०६ | — | ०१ | ०१ | — | ०२ | ०१ | — |

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७. ★ शैक्षणिक विभाग ★